# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक- १२ जानेवारी २०१५

## मुंबई विद्यापीठात युवा दिवस उत्साहात साजरा

मुंबई- मुंबई विद्यापीठाचा युवा दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.स्वामी विवेकानंदांच्या जयंती प्रित्यर्थ आयोजित केलेल्या या युवा दिनाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये राष्ट्रसेवेचे व्रत रुजविण्याचे काम सातत्याने राष्ट्रपातळीवर केले जाते.यात मुंबई विद्यापीठाचा सिंहाचा वाटा आहे.मुंबई विद्यापीठातील सहा जिल्ह्यातील जवळपास १०० महाविद्यालयातील अडीच हजार विद्यार्थ्यांने या कार्यक्रमात भाग घेतला.**युवा नेतृत्वाचे सक्षमीकरण** या संकल्पनेवर या वर्षीचा युवा दिवसाचा कार्यक्रम आधारीत होता.यावर्षीच्या युवा दिवसाच्या कार्यक्रमाला विविध मान्यवर उपस्थित प्रामुख्याने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजन वेळूकर हे होते.

यावेळी कुलगुरु डॉ.राजन वेळूकर बोलतांना म्हणाले की, युवक हे राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत.राष्ट्रउभारणीसाठी युवकांची मोठी मदत लागेल.राष्ट्र उभारणीसाठी युवकांनी शिक्षणाचं हत्यार हाती घेऊन एका संपन्न आणि समृध्द राष्ट्राची उभारणी करावी.शिक्षणातूनच ख-या राष्ट्राची उभारणी होईल असा विश्वास त्यांनी समस्त विद्यार्थ्यांना दिला.पुढे बोलताना ते म्हणाले की, आजचा तरुणवर्ग हा संवेदनशील आहे.या तरुणांच्या हातात राष्ट्रउभारणीची मोठी ताकद असुन युवाशक्ती हीच खरी राष्ट्राची संपत्ती असल्याने साश्वत विकास आणि समाजपरिवर्तनाची नांदी या युवाशक्तीच्या माध्यमातून सहज शक्य असल्याचे प्रतिपादन कुलगुरु डॉ.राजन वेळूकर यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर भाषण मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.नरेश चंद्र यांनी केले.त्यांनी उपस्थित विद्यार्थी वर्गाला यशाचे गमक हे प्रयत्नामध्ये असल्याचे पटवून दिले.कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात राकेश बक्षी,माजी कर्णधार भारतीय फुटबाल टीम आणि अमोल मुजुमदार माजी कर्णधार मुंबई रणजी क्रिकेट हे होते.या दोघाही मार्गदर्शकांनी आपल्या कारकिर्दितले अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले.

तर सुप्रसिध्द सिनेअभिनेते मकरंद अनासपुरे यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला.आजच्या प्रत्येक तरुणांनी ध्येय उराशी बाळगणे ही खरी काळाची गरज असुन समाजाला काहीतरी देणे आहे ही भावना प्रत्येकांने बाळगावी असा संदेश दिला.आज समाजात रिअल हिरो आणि रील हिरो यांच्यात फरक असुन प्रत्येकांने रिअल हिरोना आपला आदर्श मानून त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन मार्गक्रमण करावा असा संदेश दिला.तर सुप्रसिध्द लोककलावंत आणि पार्श्वगायक नंदेश उमप यांनी विद्यार्थ्यांना सक्सेस मंत्रा दिला.विद्यार्थ्यांशी दिलखुलाश संवाद साधताना अनुभवातून बरेच काही शिकता येण्यासारखं

असल्याचे त्यांनी सांगितले.मी स्वतः अनुभवातून कसा शिकत गेलो याचे अनेक उदाहरण त्यांनी विद्यार्थ्यांना दिले.पहिल्या सत्राच्या शेवटच्या टप्प्यात काही विद्यार्थ्यांनी मल्लखांबाचे प्रात्याक्षिक करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या दुस-या सत्रात सुप्रसिध्द सिने अभिनेत्री उर्मिला कानेटकर हिने महिला सक्षमीकरण आणि प्रसारमाध्यमांची भूमिका यावर प्रकाश टाकला.तर सामाजिक कार्यकर्त्या वैशाली पाटील यांनी राष्ट्रनिर्मितीमध्ये युवकांचा सहभाग हा मोठा असुन नवनिर्मितीचे बीज याच युवाशक्तीमध्ये एकवटले असल्याचे सांगितले.आज देशातील सर्वाधिक ६० टक्के युवा हा मतदार असुन निर्णयप्रक्रियेत या युवाशक्तीने सहभागी व्हावे असेही त्या म्हणाल्या.तर सामाजिक कार्यकर्त्या मुक्ता दाभोळकर यांनी युवाशक्तीला प्रेरणादायी मार्गदर्शन केले.प्रत्येकांने आपल्या विवेकबुध्दीनुसार निर्णयप्रक्रियेत सहभागी होउन विवेकी हस्तक्षेपावर विश्वास ठेऊन जग बदलण्याची किमया सहज साधता येणार असल्याचा आशावाद व्यक्त केला.या कार्यक्रमाच्या निरोपाअंती बीसीयुडी संचालक डॉ.राजपाल हांडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत मुंबई विद्यापीठाअंतर्गत युवाशक्तीला चालना आणि प्रेरणा देण्यासाठी गेल्या तीन वर्षापासून मुंबई विद्यापीठात युवा दिवस साजरा केला जात आहे.युवा प्रेरणेतून अखंड भारत निर्माणाची संकल्पना सत्यात उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले.युवाशक्ती हीच खरी राष्ट्राची संपत्ती असुन तीचा पुरेपुर वापर झाल्यास हे राष्ट्र सुजलाम,सुफलाम आणि सशक्त राष्ट्र म्हणून जगाच्या पाठीवर उभे राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या युवा दिवसाच्या कार्यक्रमासाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना,राष्ट्रीय छात्र सेना,आजीवन अध्ययन केंद्र,विद्यार्थी कल्याण विभाग आणि इतर विभागांचा उत्स्फुर्त सहभाग लाभला होता.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.नमिता निंबाळकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.बाबासाहेब बिडवे यांनी केले.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)